राष्ट्रीय हिवताप निर्मुलन कार्यक्रमांतर्गत ४१६४ अस्थायी पदे पुढे चालु ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः हिनिका -२०१८/अपदे/प्र.क्र.४५/आरोग्य-५

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार,
संकुल इमारत, १० वा मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ००१
तारीख: ४ एप्रिल, २०१८

संदर्भ:-

1. **सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांकः पदआ २००६/१२८/प्र.क्र.१९/आरोग्य-२, दि. ३०/१२/२००६ .**
2. **सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांकः पदआ २००७/प्र.क्र.११७/सेवा-१, दि. ६/ ८/ २००७ .**
3. **सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक : हिनिका-२०१८/अपदे/प्र.क्र.४५/आरोग्य-५, दि.०७/०२/२०१८**
4. **सहसंचालक, आरोग्य सेवा, (अर्थ व प्रशासन) मुंबई यांचे पत्र क्र.संआसे/किजरो/ राहिनिका/२० टक्के/४१६४ अपदे /मान्यता/प्रस्ताव ३८३-८४/कक्ष-१८/२०१८ दि.२१/३/२०१८.**

शासन निर्णय:

राष्ट्रीय हिवताप निर्मुलन कार्यक्रमांतर्गत २०१६६ अस्थायी पदांपैकी १६१३३ अस्थायी पदे दिनांक ३०/४/२०१२ च्या शासन निर्णयान्वये कायम करण्यात आलेली आहेत. उर्वरित ४०३३ अस्थायी पदे तसेच पदांच्या आढाव्यातून सुटलेली सुधारित आकृतीबंध सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.पदआ-२००७/प्र.क्र.११७/सेवा-१, दिनांक २१/९/२०१२ अन्वये मंजूरी दिलेली उपकेंद्र स्तरावरील १३१ पदे अशी एकूण ४१६४ पदे दिनांक १/०१/२०१८ ते २८/२/२०१८ पर्यंत वरील अनु. क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये पुढे चालू ठेवण्यात आली होती. सदर पदे राज्यातील जनतेस आरोग्य विषयक सेवा सातत्याने उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने आवश्यक असल्याने, या पदांना दिनांक १/३/२०१८ ते ३०/९/२०१८ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर पदांचा खर्च खाली दर्शविण्यात आलेल्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व सन २०१८-२०१९ साठीच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

१) मागणी क्रमांक आर-१
२२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०६-सार्वजनिक आरोग्य
१०१-रोगप्रतिबंध व नियंत्रण
(०१) (०५) हिवताप नियंत्रण कार्यक्रम (राज्य क्षेत्र)
सांकेतांक - (२२१० ०६११)

२) मागणी क्रमांक आर-१
२२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०६-सार्वजनिक आरोग्य
१०१-रोगप्रतिबंध व नियंत्रण
(०१) (५२) हिवताप नियंत्रण कार्यक्रम (स्थानिक क्षेत्र)
सांकेतांक - (२२१० ५२१९)

३) मागणी क्रमांक आर-१
२२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०६-सार्वजनिक आरोग्य
००१-संचालन व प्रशासन
(०१) (०५) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१ च्या कलम १८३ अन्वये जिल्हा परिषदांना आस्थापना अनुदाने
सांकेतांक - (२२१० ०३८९)

४) मागणी क्रमांक आर-१
२२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०६-सार्वजनिक आरोग्य
००१-संचालन व प्रशासन
(०२) (०८) प्राथमिक आरोग्य केंद्रे (स्थानिक क्षेत्र)
सांकेतांक - (२२१० ५०४१)

३. सदर शासन निर्णय वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.०५ मार्च, २०१८ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४०४११५९२९१४१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

५. महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Sanjay R More

Digitally signed by Sanjay R More
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7256abb8dd472637941e581488fb02eda9e0d6b701c434bcf471a0d525f80681, cn=Sanjay R More
Date: 2018.04.04 12:20:40 +05'30'

(स. रा. मोरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
२. सहसंचालक, आरोग्य सेवा (हि. ह. व ज. रो), पुणे.
३. उपसंचालक, आरोग्य सेवा मंडळे (सर्व).
४. सहायक संचालक, आरोग्य सेवा, (हिवताप) सर्व.
५. जिल्हा हिवताप अधिकारी, (सर्व).
६. हत्तीरोग अधिकारी, हत्तीरोग प्रशिक्षण पथके (सर्व).
७. आयुक्त, महानगरपालिका ठाणे/नागपूर.
८. महालेखापाल-१/२, महाराष्ट्र (लेखापरिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
९. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व).
१०. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई/निवासी लेखाधिकारी, मुंबई.
११. वित्त विभाग (व्यय-१३), (अर्थसंकल्प-१९), मंत्रालय मुंबई.
१२. सार्वजनिक आरोग्य विभाग, (सेवा १, २, ३, ५ व अर्थसंकल्प शाखा) मंत्रालय, मुंबई.
१३. निवडनस्ती (आरोग्य-५).